| महाराष्ट्र पोलीस | क्र.पोमसं/१/विवक्षीत कामे/कंत्राटी-नियुक्ती/८३/२०२०<br>पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,<br>शहिद भगतसिंग मार्ग,कुलाबा, मुंबई-४००० ००१.<br>दिनांक :- १६/०६/२०२० |
|---|---|

**प्रति,**

महासंचालक,
माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन,
नवीन प्रशासकिय भवन, १७ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२

**विषय :-** पोलीस महासंचालक यांचे नक्षल विरोधी अभियान सल्लागार म्हणुन कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत.

---oo---

**महोदय,**

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने या पत्रासोबत जोडलेल्या जाहिरातीनुसार पोलीस महांचालक महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ठराविक वेतनावर सेवानिवृत्त झालेल्या विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी यांची गुप्तवार्ता अधिकारी, म्हणुन पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे मुलाखतीद्वारे नेमणुक करावयाची असल्याने शासन मान्यता प्राप्त वृत्तपत्रात प्रकाशित करण्याबाबत विनंती करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव व पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१. ( दुरध्वनी क्रमांक ०२२-२०८२९८०१)<br>ईमेल- arvind.andhere1975gov.in |
| २ | जाहिरात प्रकाशित करण्याचा स्तर | विभागीय/जिल्हास्तर या ठिकाणी |
| ३ | जिल्हयाचे नांव जेथे जाहिरात प्रकाशित करावयाची आहे. | मुंबई,औरंगाबाद,नाशिक, नागपुर व पुणे |
| ४ | जाहिरातीचे देयक ज्यांना प्रदानाकरिता पाठवावयाचे आहे त्याचे नांव | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई |
| ५ | जाहिरातीकरिता वृत्तपत्राचे नांव लिहु नये | मराठी, हिंदी, इंग्रजी |
| ६ | जाहिरात प्रत्येक वृत्तपत्रात कितीवेळा प्रसिध्द करावी | एक वेळा |

२. सोबत थेट मुलाखतीचे जाहिरातीच्या प्रती टंकलेखनातील जोडलेल्या आहेत. कृपया उपरोक्त प्रमाणे मराठी, हिंदी वृत्तपत्रात प्रकाशित कराव्यात, हि विनंती.

आपला विश्वासू,

16/06/2020

(राजेश प्रधान)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, म.राज्य,मुंबई यांचे करिता.

# जाहिरात-(विवक्षित कामासाठी)

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई येथील कार्यालयात पोलीस महासंचालक यांचे नक्षल विरोधी अभियानाचे सल्लागार म्हणुन सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक यांची सेवा करार पध्दतीने **विवक्षित कामासाठी** नेमणुक करावयाचे विचाराधीन आहे. मुळनिवृत्ती वेतन व महागाई भत्ता, मासिक परिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम (निवास भत्ता, प्रवास भत्ता, आणि दुरध्वनी भत्ता ) या सर्व भत्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेयता असलेले नियुक्त करावयाच्या अधिका-यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यांत आलेल्या सोयीसुविधा इ.बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यांत येईल. सेवानिवृत्त अधिकारी यांचे पॅनल तयार करावयाची आहे. सदर कामाकरिता अर्जाचा विहीत नमूना जोडलेला आहे. सदरचा अर्ज दिनांक २९/६/२०२० पर्यंत या कार्यालयात पाठविण्यांत यावा.

२. सदर नामिकासूचीची वैद्यता जास्तीत जास्त ०३ वर्षे राहील विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पुर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी निश्चित करणार.

३. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी सबंधित व्यक्तीची राहिल.

४. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यांत येईल.

५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यांत आलेली व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यतच कार्यरत राहु शकेल.

६. मुलाखतीचा दिनांक ०१/०७/२०२०, वेळ दुपारी १२.०० वाजता.

7. ठिकाण :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय, शहिद भगतसिंग रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००१, दुरध्वनी क्रमांक ०२२२०८२९८०१, ईमेल-arvind.andhere1975gov.in

८. इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०१/०७/२०२० रोजी दूपारी १२.०० वाजता खालील मुळ कागदपत्रे साक्षांकित केलेल्या प्रतीसह व दोन पासपोर्ट फोटोसह मुलाखतीस उपिस्थित रहावे.

९. (१) जन्मतारखेचा पुरावा (२) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (३) सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवतून निवृत्तीचे प्रमाणपत्र (सेवानिवृत्ती वेतनाचे सर्व कागदपत्राचे छायांकित प्रती )

१०. पोलीस महासंचालक यांचे नक्षल विरोधी अभियान सल्लागार पदी नियुक्तीच्या अटी/शर्ती व इतर तपशील त्याचप्रमाणे करावयाच्या अर्जाचा नमूना पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**अर्हता अनुभव :-**

१. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा सबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पुर्व अट पुर्ण असणे आवश्यक आहे.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**अटी व शर्ती :-**

१. करार पध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे समावून घेण्याचे या नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेली व्यक्ती , सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींने गुंतलेले हितसबंध जाहीर करणे आवश्यक राहिल.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहिल.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तीने त्याच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहिल, त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करीतल.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

८. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त /स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यांत येईल. कराराचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुर्ननियुक्ती देण्यांत येणार नाही.

९. मुलाखतीस उपस्थित राहणा-या अधिका-यास येण्या-जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे देण्यांत येणार नाही.

(राजेश प्रधान)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना )
पोलीस महासंचालक यांचे करिता.

01/8/2016

# अर्जाचा नमूना

**अ) नक्षलग्रस्त भागात विशेष गुप्त वार्ता संकलन व नक्षलवादी अभियानात समन्वयासाठी सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी, पोलीस महासंचालक यांचे सल्लागार** पदाकरिता अर्ज

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

**कार्यालयीन उपयोगासाठी**

**1. अर्ज क्रमांक :** ☐☐☐☐☐☐☐

**2. अर्ज स्विकारल्याचा दिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

**3. अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) :** ______________

---

**सूचना :** अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

\# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

1. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव

मराठीत :______________________________

#इंग्रजीत:☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

2. **पत्रव्यवहाराचा पत्ता:** ______________________________

तालुका :______________ जिल्हा :______________ पिन कोड : ☐☐☐ ☐☐☐

3. **कायमचा पत्ता :** ______________________________

तालुका :______________ जिल्हा :______________ पिन कोड : ☐☐☐☐☐☐

4. **दूरध्वनी क्रमांक -** लॅन्डलाईन ______________ मोबाईल क्रमांक :______________

4A. **ई-मेल :** ______________________________

5. **जन्मदिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ :______________

6. दिनांक ३०/०६/२०२० रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
दिवस महिना वर्ष

7. लिंग : पुरूष ☐ / महिला ☐

8. धर्म : ______________ जात : ______________

9. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय ☐ / नाही ☐

10. अर्जदाराची माहिती.

| अक्र | माहितीचा तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | शासकिय सेवेत दाखल झाल्याचा दिनांक | |
| २ | विशेष पोलीस महानिरीक्षक पदाचा एकूण अनुभव | |
| ३ | नक्षल विभाग केलेल्या सेवेचा कालावधी | |

13-अ अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात/ बध्द करण्यात/ दंड करण्यात/ सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय ? होय ☐ नाही ☐

13-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय ☐ नाही ☐

(13-अ किंवा 13-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यीदीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.

** ** **

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी श्री./सौ./कु ______________________________ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच कंत्राटी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**